RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ०५ ] शुक्रवार, ऑक्टोबर २४, २०२५ / कार्तिक २, शके १९४७ [ पृष्ठे ०४

## असाधारण क्रमांक ०५

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

### अधिसूचना

### प्रपत्र 'ड'

### विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुका

**शासन निर्णय क्रमांक**

१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक विकाअ- ११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ३ फेब्रुवारी २०२५.

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन शुद्धिपत्रक क्रमांक विकाअ-११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५.

३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन शुद्धिपत्रक क्रमांक विकाअ-११२५/प्र.क्र.०५/का-५/कार्या-विकाअ, दिनांक १ सप्टेंबर २०२५.

क्रमांक एसईएम/कावि/ई.-२१६२२७२/२०२५.— उपोद्घातातील शासन निर्णय १, २ व ३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे. गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर दादासाहेब गायकवाड व भगवान बिरसा मुंडा आदिवासी सेवक या पुरस्कार प्राप्त व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जितेंद्र डूडी (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे खाली नमूद अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची "विशेष कार्यकारी अधिकारी" म्हणून नियुक्ती करीत आहे. सदरची नियुक्ती आदेशापासून विशेष कार्यकारी अधिकारी व्यक्तीच्या वयाच्या ६५ वर्षांपर्यंत अमलात राहील.

विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या नियुक्तीच्या आदेशापासून ५ वर्षांसाठी असेल. विहित कालावधीनंतर ती आपोआप संपुष्टात येईल. नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्यांचेविरुद्ध गंभीर गुन्ह्याची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा त्यास नादार म्हणून जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही पूर्वसूचना न देता अशी नियुक्ती मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांस असतील. सदरची नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, पुणे यांना राहील.

**विशेष कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये--**

१. विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरिकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.

२. वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि भूकंपासारख्या आपत्तीमुळे होणारी जीवित हानी, कोणतीही आकस्मिक घटना जिच्यामुळे होणारी जीवित हानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात / नदीत वाहून गेलेले इत्यादींकरिता शोध व बचाव पथकास "आपदा मित्रास", तसेच स्थानिक पातळीवर महसूल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे, तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.

३. ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य, तसेच सण व उत्सवाच्या काळात अनुचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.

४. शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.

५. निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नावे, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागास देण्याकरिता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

६. आपले सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्र / आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरिता नागरिकांना आवश्यक सहकार्य करणे.

७. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, कृषी, पशुसंवर्धन इत्यादी विषयाबाबत नागरिकांना आवश्यक सहकार्य करणे.

८. हुंडा, व्यसनाधीनता, बालमजुरी, बालविवाह, वेठबिगारी प्रथा संपविण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

९. महिला, मुले व वृद्धांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.

१०. प्रदूषण नियंत्रणासाठी व वाहतुकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

११. पोलिसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यांमध्ये पंच म्हणून काम करणे.

१२. समाजामध्ये एकोपा, तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण राहावे याकरिता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.

१३. शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा, अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

**सर्वसाधारण :--**

१. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामसभेमध्ये विशेष निमंत्रित सदस्य असतील.

२. विशेष कार्यकारी अधिकारी हे राष्ट्रीय सण व उत्सवामध्ये ग्राम पातळीवर विशेष निमंत्रित सदस्य असतील.

३. विशेष कार्यकारी अधिकारी यांना राज्य शासनाच्या तालुकास्तरीय विभागात / कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीकरिता प्राधान्य असेल.

४. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामस्तरीय दक्षता समितीमध्ये निमंत्रित सदस्य असतील.

५. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती "मानसेवी" असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकाऱ्याला कोणतेही मानधन अथवा वेतन/ भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

६. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने घरावर, दुकानावर, कार्यालयावर स्वत:च्या नावासह "विशेष कार्यकारी अधिकारी" असा फलक लावण्याची अनुमती असेल, त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत. तथापि, त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर "विशेष कार्यकारी अधिकारी" असा उल्लेख करू नये.

**विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करावयाच्या व्यक्तींची अनुसूची**

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव | वय | पत्ता | शिक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | काळूराम पांडूरंग लांडगे | ५९ | पांडुरंगकृपा बिल्डिंग, पुणे-मुंबई रोड, कासारवाडी, पुणे-४११ ०३४. | दहावी पास |
| २. | संजय महादेव जावळकर | ६१ | वेताळ बंगला, मु. पो. खानापूर, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पिन-४११ ०५२. | पदवीधर |
| ३. | मच्छिंद्रनाथ रामभाऊ धनवे | ६२ | ई-१, समृद्धीनगर, तिन्हेवाडी रोड, राजगुरूनगर, तालुका खेड, जिल्हा पुणे, पिन-४१० ५०५. | पदवीधर |

**जितेंद्र डूडी** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी, पुणे.

पुणे, १४ ऑक्टोबर २०२५.

## अधिसूचना

## प्रपत्र 'ड'

## विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुका

**शासन निर्णय क्रमांक**

१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक विकाअ-११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ३ फेब्रुवारी २०२५.

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन शुद्धिपत्रक क्रमांक विकास-११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५.

क्रमांक एसईएम/कावि/ई.-२१५५०६८/२०२५.— उपोद्घातातील शासन निर्णय १ व २ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे. खालील नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पात्र व्यक्तींची राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची गट 'अ' व गट 'ब' (राजपत्रित) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जितेंद्र डूडी (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे खाली नमूद अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची "विशेष कार्यकारी अधिकारी" म्हणून नियुक्ती करीत आहे. सदरची नियुक्ती आदेशापासून विशेष कार्यकारी अधिकारी व्यक्तीच्या वयाच्या ६५ वर्षांपर्यंत अमलात राहील.

विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या नियुक्तीच्या आदेशापासून ५ वर्षांसाठी असेल. विहित कालावधीनंतर ती आपोआप संपुष्टात येईल. नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्यांचेविरुद्ध गंभीर गुन्ह्याची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा त्यास नादार म्हणून जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही पूर्वसूचना न देता अशी नियुक्ती मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांस असतील. सदरची नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, पुणे यांना राहील.

**विशेष कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये--**

१. विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरिकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.

२. वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि भूकंपासारख्या आपत्तीमुळे होणारी जीवित हानी, कोणतीही आकस्मिक घटना जिच्यामुळे होणारी जीवित हानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात / नदीत वाहून गेलेले इत्यादींकरिता शोध व बचाव पथकास "आपदा मित्रास", तसेच स्थानिक पातळीवर महसूल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे, तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.

३. ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य, तसेच सण व उत्सवाच्या काळात अनुचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.

४. शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.

५. निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नावे, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागास देण्याकरिता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

६. आपले सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्र / आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरिता नागरिकांना आवश्यक सहकार्य करणे.

७. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, कृषी, पशुसंवर्धन इत्यादी विषयाबाबत नागरिकांना आवश्यक सहकार्य करणे.

८. हुंडा, व्यसनाधीनता, बालमजुरी, बालविवाह, वेठबिगारी प्रथा संपविण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

९. महिला, मुले व वृद्धांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.

१०. प्रदूषण नियंत्रणासाठी व वाहतुकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

११. पोलिसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यांमध्ये पंच म्हणून काम करणे.

१२. समाजामध्ये एकोपा, तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण राहावे याकरिता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.

१३. शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा, अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

**सर्वसाधारण :--**

१. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामसभेमध्ये विशेष निमंत्रित सदस्य असतील.

२. विशेष कार्यकारी अधिकारी हे राष्ट्रीय सण व उत्सवामध्ये ग्राम पातळीवर विशेष निमंत्रित सदस्य असतील.

३. विशेष कार्यकारी अधिकारी यांना राज्य शासनाच्या तालुकास्तरीय विभागात / कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीकरिता प्राधान्य असेल.

४. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामस्तरीय दक्षता समितीमध्ये निमंत्रित सदस्य असतील.

५. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती "मानसेवी" असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकाऱ्याला कोणतेही मानधन अथवा वेतन/ भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

६. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने घरावर, दुकानावर, कार्यालयावर स्वत:च्या नावासह "विशेष कार्यकारी अधिकारी" असा फलक लावण्याची अनुमती असेल, त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत. तथापि, त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर "विशेष कार्यकारी अधिकारी" असा उल्लेख करू नये.

**विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करावयाच्या व्यक्तींची अनुसूची**

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव | वय | पत्ता | शिक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | नंदकुमार ज्ञानदेव शिंदे | ६१ | राहणार बी-३/१७, श्रीरामनगर हाउसिंग सोसायटी, औंध, पुणे. | पदवीधर |
| २. | संजय नथु गुजर | ६४ | राहणार सर्व्हे नंबर ७०, दीपमळा, चव्हाण वस्ती, दौंड, तालुका दौंड, जिल्हा पुणे. | बारावी पास |
| ३. | अजित रामचंद्र कदम | ६४ | राहणार अभ्युदय को-ऑप. हाउसिंग सोसायटी, सर्व्हे नंबर ५२/२, फ्लॅट नंबर ४६, वानवडी, पुणे. | पदवीधर |

**जितेंद्र डूडी** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी, पुणे.

पुणे, १४ ऑक्टोबर २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.